# <u>डॉ. आंबेडकर महाविद्यालय,</u>

## दीक्षाभूमी, नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

## 2018-2019

### रा. से. यो. चा निरोप समारंभ

दिनांक: १०/३/२०१९

राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थांचा सर्वांगीन विकास करणारी संस्था आहे. मानवी जीवनाचे उत्थान करण्याचे काम अश्याप्रकारच्या संस्थेद्वारा होत असते. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये कार्य केल्यामुळे विद्यार्थांच्या मनावर चांगले संस्कार तर घडतात पण माणूस म्हणून समजातल्या शेवटच्या माणसाचं सुख-दुख जाणून घेण्यास मदत होते. मानवी बुद्धिचं भेद निर्माण करणारं वातावरण आज देशात निर्माण केलं जात आहे. विद्यार्थांना वाचनाची सवय व स्वबुद्धीने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक डॉ. प्रकाश खरात यांनी केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी,नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमाचे प्रमुख अतिथि म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून परमपपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य श्री. एन. आर. सुटे, श्री. विलास गजघाटे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. सी. पी. फरकाडे मंचावर उपस्थित होते.

डॉ. प्रकाश खरात म्हणाले, विद्यार्थांनी आपल्या आचरनातून बंधुभाव वाढीस लावला पाहिजे. आचरनातून मोठ-मोठ्या संकटांची दोन हात करता येते. म्हणून आचरण चांगले असले की आपल्या सोबतच इतरांनचा विकास होण्यास मदत होते हा खरा राष्ट्रवाद आहे. विद्यार्थांनीच आजपर्यंत राष्ट्राला मोठे केले आहे. जगणं ही राष्ट्राची खरी ओळख नाही तर शेवटच्या माणसाचं कल्याण करणं हीच राष्ट्राची खरी ओळख आहे. आणि समाजातील शेवटच्या माणसाची ओळख राष्ट्रीय सेवा योजना करून देत असल्याचे त्यांनी संगितले.

श्री. विलास गजघाटे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले, तसेच विद्यार्थांना अभ्यासासोबत राष्ट्रीय सेवा योजने मध्ये व्यक्तिमहत्वाचे धडे देत मिळत असतात. व्यक्तिमहत्व

विकास करण्याचं चांगलं माध्यम म्हणून रा. से. यो. कडे पहिले जाते. स्वतंत्र प्रज्ञेने विचार करणारा एखादा विद्यार्थी असतो. तोच विद्यार्थी जगाला सुंदर बनवितो असे संगितले.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून बोलतांना श्री. एन. आर. सुटे म्हणाले, या पवित्र दीक्षाभूमीवर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. आंबेडकरांचे विचार कळतात. त्याच्या कार्य-कर्तुत्वाचे जाणीव होते. देशाला चांगला विचार देणाऱ्या महापुरुषापासून मिळणारी प्रेरणा ही डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील रा. से. यो. च्या माध्यमातून मिळत असते.

रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी आपल्या प्रस्ताविकेतून रा. से. यो. च्या द्वारा वर्षभर केलेल्या उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन नयन भस्मे यांनी तर आभार हर्षल जांभूळकर यांनी केले.




Unnamed Road, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-03-10(Sun) 11:34(AM)


Unnamed Road, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-03-10(Sun) 11:40(AM)


Unnamed Road, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-03-10(Sun) 12:02(PM)